Please Consider the Environment Before Printing…

**Date: 09/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आपल्या बातम्या... आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष



### प्रख्यात सरोद वादक अमजद अली खान

अमजद अली खान हे भारतीय शास्त्रीय सरोद वादक आहेत. ते त्यांच्या स्पष्ट आणि वेगवान ईखारा तानांसाठी प्रसिद्ध आहेत. खान यांचा जन्म ९ ऑक्टोबर १९४५ रोजी ग्वाल्हेर येथे शास्त्रीय संगीताच्या कुटुंबात झाला. अमजद अली खान यांना आपली सुरुवातीची तालीम वडिलांकडून मिळाली. त्यांचे वडील उस्ताद हाफिज अली खान हे ग्वाल्हेर राज-दरबारमध्ये प्रतिष्ठित संगीतज्ञ होते. त्यांची मुले अमान अली आणि अयान अली 'बंगश' जगभर आपल्या वडिलांच्या जोडीने तसेच आपसातल्या जुगलबंदीच्या सरोद वादनाच्या मैफिली गाजवतात. या त्रयीने सरोदच्या तारा छेडताच त्या वाद्यातून उमटणारा वेगळाच गाज, सुरांचे माधुर्य आणि 'बंगश' घराण्याची राजमुद्रा भाळी घेऊन आलेला शैलीदार नाद चटकन ओळखता येतो. श्रोत्यांच्या मनावर तो कायमची छापही सोडून जातो.

सच्चं, सुरेल आणि पराकोटीचं सृजनशील जीवन जगण्यासाठी लागणारी आई सरस्वतीच्या कृपेची शिदोरी अमजद अलींनी आपल्या मुलांना दिलेली आहे. सरोद वादनाच्या क्षेत्रात आणि एकंदरच हिंदुस्थानी अभिजात संगीतातल्या वाद्यसंगीताच्या महान परंपरेत त्यांचं स्वतःचं अढळ असं ध्रुवपदच त्यामुळे निर्माण झालं आहे. आपल्या वैशिष्ठ्यपूर्ण सरोदवादनाने भारतातीलच नव्हे, तर जगभरातील संगीतरसिकांवर ख्यातनाम सरोदवादक अमजद अली खान यांनी मोहिनी घातली आहे. खान यांना २१ वा राजीव गांधी राष्ट्रीय सद्भावना पुरस्कार प्रदान करण्यात आला. खान यांना १९७५ मध्ये पद्मश्री, १९९१ मध्ये पद्मभूषण आणि २००१ मध्ये पद्मविभूषण पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. त्यांना १९८९ साठी संगीत नाटक अकादमी पुरस्कार आणि २०११ साठी संगीत नाटक अकादमी फेलोशिपने सन्मानित करण्यात आले.

Nashik Edition
Oct 09, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401